दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com


बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | सोमवार दि.२९ डिसेंबर २०२५ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक १२५ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Monday 29 December 2025 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 125 | Pages 4 | Rate 4 Rs


## भाजपला रोखणे युतीचा मुख्य केंद्रबिंदू

**मुंबई**–हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, भारिप सोबत आमची आघाडी होती. १९९९ नंतर राजकीयदृष्ट्या आम्ही एकत्र नव्हतो. २५ वर्षानंतर आघाडीच्या घोषणेचा मला आनंद आहे. काँग्रेस आणि वंचित हे नैसर्गिक मित्र आहेत. काँग्रेस आणि वंचितमध्ये चांगलं नातं आहे, असे म्हणत त्यांनी मुंबईत वंचित आणि काँग्रेसच्या आघाडीची घोषणा केली. आमची आघाडी विचाराची आहे. सत्तेसाठी आमची आघाडी नाही. जागांपेक्षा विचारांना आम्ही प्राधान्य देत आहोत. हा संख्येचा खेळ नाही तर विचारांचा मेळ आहे. आमची आघाडी विचारांची आहे, सत्तेसाठी नाही. आजपासून आम्ही दोन मित्रपक्ष आहोत. मुंबई महापालिकेत वंचित आणि काँग्रेस एकत्र लढणार, असे देखील ते म्हणाले.

# मुंबई महापालिकेसाठी
# काँग्रेस-वंचित २५ वर्षांनी एकत्र




दैनिक वादळ वार्ता मुंबई (प्रतिनिधी)–मुंबई महानगरपालिका निवडणूक २०२६ साठी काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीची युती झाली असून, वंचित ६२ जागा लढवणार आहे. आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या राजकारणात एक मोठी आणि महत्त्वाची घडामोडी समोर आली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या चर्चेला अखेर पूर्णविराम मिळाला आहे. मुंबई महापालिका निवडणुकीसाठी काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी (VBA) यांनी मुंबईत युतीची अधिकृत घोषणा केली आहे. या नव्या समीकरणामुळे मुंबई महापालिकेच्या रणांगणात आता तिरंगी किंवा चौरंगी लढत होणार असल्याचे पाहायला मिळणार आहे.



### दोन्ही पक्षांच्या प्रमुख नेत्यांच्या सह्या

नुकतंच वंचित बहुजन आघाडीने एक प्रसिद्ध पत्रक जारी केले आहे. या अधिकृत पत्रानुसार, मुंबई महापालिकेच्या एकूण २२७ जागांपैकी ६२ जागांवर वंचित बहुजन आघाडी आपले उमेदवार उभे करणार आहे. तर उर्वरित जागांवर काँग्रेस आपले उमेदवार रिंगणात उतरवणार आहे. विशेष म्हणजे, या ६२ जागांच्या यादीवर दोन्ही पक्षांच्या प्रमुख नेत्यांच्या सही असल्याचे दिसत आहे. त्यामुळे यात आता कोणताही बदल केला जाणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. या निर्णयाला वंचितचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनीही ऑनलाईन बैठकीद्वारे मान्यता दिली आहे. वंचित बहुजन आघाडीकडे देण्यात आलेल्या ६२ जागांमध्ये वॉर्ड क्र. ६, ११, १२, ८४, ९५, १२७, १५३ आणि २२५ यांसारख्या विविध महत्त्वाच्या मतदारसंघांचा समावेश आहे.



### ही विचारांची आघाडी

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी या युतीचे स्वागत करताना सांगितले की, काँग्रेस आणि वंचित हे नैसर्गिक मित्र आहेत. १९९९ नंतर राजकीय कारणांमुळे हे दोन्ही पक्ष स्वतंत्र लढत होते, मात्र तब्बल २५ वर्षांनंतर पुन्हा एकदा हे दोन्ही पक्ष मुंबईच्या विकासासाठी आणि भाजपला रोखण्यासाठी एकत्र आले आहेत. ही आघाडी केवळ सत्तेसाठी नसून विचारांची आघाडी असल्याचे त्यांनी नमूद केले.

## गैरहजेरीत पगार काढणाऱ्या तलाठी मॅडमची होणार चौकशी

### जिल्हाधिकाऱ्यांनी काढले चौकशीपत्र; मा.नगरसेवक कपिल मस्केंनी पगाराच्या घोटाळ्याचा केला होता पाठपुरावा

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील कुंबेफळ सज्जा येथे नियुक्त असलेल्या ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) मॅडम यांच्या विरोधात कामावर हजर नसताना तब्बल ९ महिन्यांचा पगार काढल्याचा आरोप होत असून, या प्रकरणात आता अधिकृत चौकशीची प्रक्रिया सुरू झाली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित प्रकरणी चौकशीपत्र काढल्याची माहिती समोर आली आहे.

या संदर्भात माजी नगरसेवक कपिल अंबादास मस्के यांनी वारंवार पाठपुरावा करून लेखी तक्रार दाखल केली होती. त्यांच्या तक्रारीच्या आधारे संबंधित कार्यालयाकडून अर्जाची दखल घेण्यात आली असून आरोपींविरुद्ध सखोल चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत.

तक्रारीनुसार, संबंधित तलाठी प्रत्यक्ष हजर नसतानाही त्यांचा पगार नियमितपणे काढण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी जबाबदार अधिकारी व संबंधित कर्मचारी यांची चौकशी होणार आहे. दोषी आढळल्यास पुढील कारवाई केली जाईल, असे प्रशासनाकडून संकेत मिळाले आहेत. दरम्यान, या प्रकरणामुळे महसूल



विभागातील कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून नागरिकांत संतापाची भावना व्यक्त होत आहे. पारदर्शक चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे, अशी मागणी होत आहे. प्रकरणाचा अंतिम अहवाल आल्यानंतरच वास्तविकता स्पष्ट होणार आहे. तोपर्यंत सर्वांचे लक्ष या चौकशीकडे लागले आहे.

## माता नर्मदा परिक्रमा पूर्ण करून गुरुवर्य महंत शिवाजी महाराज यांचे नारायणगड येथे भव्य आगमन

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

माता नर्मदा परिक्रमा यशस्वीरीत्या पूर्ण करून श्री क्षेत्र नारायणगडचे मठाधिपती गुरुवर्य महंत शिवाजी महाराज यांचे मंगळवार, दि. ३० डिसेंबर २०२५ रोजी श्री क्षेत्र नारायणगड येथे भव्य आगमन होणार आहे. या पावन प्रसंगी मंगळवार, दि. ३० डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ठीक ८ वाजता गेवराई येथे बाबांचे भक्तिभावाने स्वागत करण्यात येणार असून त्यानंतर श्री क्षेत्र नारायणगडपर्यंत भव्य स्वागत रॅलीद्वारे मार्गक्रमण करण्यात येणार आहे.

ही स्वागत रॅली गेवराई येथून प्रारंभ होऊन गढी पाडळसिंगी, मादळमोही फाटा, पोखरी फाटा, सिरसमार्ग, पारगाव सिरस, सोनगाव, दिमाखवाडी–साक्षाळ पिंप्री, पौंडुळ फाटा मार्गे श्री क्षेत्र नारायणगड येथे समारोप होणार आहे.

माता नर्मदा परिक्रमा पूर्ण केल्याबद्दल गुरुवर्य महंत शिवाजी महाराज यांच्या



दर्शनासाठी व स्वागतासाठी परिसरातील भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण असून श्री क्षेत्र नारायणगड सर्व भक्तगणांच्या वतीने भाविकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.या भव्य स्वागत रॅलीत सहभागी होऊन गुरुवर्य महंत शिवाजी महाराजांचे दर्शन व आशीर्वाद घेण्याची संधी साधावी, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## नायगाव-बिलोली परिसरात बिबट्याचा धुमाकूळ

### शेतकर्यांच्या सुरक्षेसाठी तातडीच्या उपाययोजनांची जिल्हा उपाध्यक्ष माधव पटने यांची मागणी

दैनिक वादळ वार्ता
**नांदेड । हानुमंत चंदनकर**

नायगाव तालुक्यातील कृष्णुर गावात गेल्या दोन दिवसांत बिबट्याच्या हालचालींमुळे दोन गंभीर घटना घडल्या. एका कारखान्यात घुसून कामगारावर हल्ल्याचा प्रयत्न आणि दुसर्या दिवशी गायीच्या कारवडीवर हल्ला झाल्याने ग्रामस्थांमध्ये मोठी भीती पसरली आहे. दरम्यान, या बिबट्याचा वावर बिलोली तालुक्यातील बामणी शिवारात असल्याची चर्चा असून शेतकरी वर्गात अधिकच चिंता निर्माण झाली आहे. दिवस-रात्र पाणी देण्यासाठी शेतात जाणार्या शेतकर्यांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनल्याने जनता दल सेक्युलर पक्षाचे नांदेड जिल्हा उपाध्यक्ष माधव लालप्पा पटने यांनी उपवनसंरक्षक, वनविभाग नांदेड यांना निवेदन देऊन तातडीच्या उपाययोजना राबविण्याची मागणी केली आहे.

पटने यांनी केलेल्या महत्त्वाच्या मागण्या पुढीलप्रमाणे जिल्ह्यातील सर्व तालुक्यांत वनविभागाकडून तात्काळ गस्त वाढविणे, ग्रामपातळीवर सतर्कता सूचना देणे व जनजागृती करणे, बिबट्या दिसल्यास ट्रॅप



कॅमेरे, पिंजरे बसवून तात्काळ कारवाई करणे, नायगाव-बिलोली भागासाठी विशेष वनपथक नियुक्त करणे, ग्रामस्थ व शेतकर्यांना अचूक माहिती देऊन अनावश्यक भीती कमी करणे आदी मागण्या केल्या आहेत. निवेदनाची आवक नोंद उपवनसंरक्षक कार्यालयात करण्यात आली असून, शेतकर्यांच्या सुरक्षेसाठी वनविभागाने तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी पटने यांनी केली आहे.

## वादळी कट्टा

### युती झाली पण विकास कुठे?

पक्षांची युती, सत्ता आली हाताशी
जनतेच्या प्रश्नांची मात्र राहिली तहान तोंडाशी

इलेक्शनच्या वेळी दिल्या मोठ्या मोठ्या बाता
जिंकल्या की मग विसरल्या रस्ते, पाणी, नाल्याच्या गाथा

या पक्षाने त्या पक्षाशी केली साटेलोटे
जनतेचे स्वप्न मात्र राहिले तुटके फाटले लोटे

विकासाचे आश्वासन झाले फक्त कागदावर
भ्रष्टाचारच नाचू लागला कामांच्या जत्रेवर

निविदा, कंत्राट, दलाली – सगळेच झाले ठराविक
सत्य बोलणाऱ्यांना दिला गप्प बसायचा संदेश ठणठणीत

खड्डे रस्ते, बंद पाणी – प्रश्न उभे टोकदार
सत्ताधारी मात्र रंगले उद्घाटनात आणि सत्कार

युतीच्या नावाखाली फक्त खुर्च्यांचा मेळा
जनतेच्या जखमेवर मीठ चोळणारा खेळ खेळा.

**–संपादक,अजय भांगे**

### केज शहरातील शिक्षक कॉलनीतील समस्या प्राधान्याने सोडवणार-हारुणभाई इनामदार

## केज शहरातील शिक्षक कॉलनी भागात लोकनेते मुंडे साहेबांच्या चौकाचे नामकरण; मान्यवरांचा नागरी सत्कार संपन्न!

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील शिक्षक कॉलनी भागातील प्रलंबित प्रश्न,रस्ते,नाल्या आणि विजेच्या समस्या प्राधान्याने सोडवल्या जातील,अशी ग्वाही नगर पंचायतचे गटनेते हारुणभाई इनामदार यांनी दिली.तसेच,या भागात १ कोटी रुपये निधीतून भव्य उद्यानाचे काम एका महिन्यात सुरू होणार असल्याचीघोषणा ही त्यांनी यावेळी केली.

शिक्षक कॉलनी भागातील आंबेजोगाई-बीड हायवेवर लोकनेते स्व.गोपीनाथराव जी मुंडे साहेब चौक' स्थापन करण्यात आला आहे.पत्रकार प्रकाश मुंडे व या भागातील युवक यांच्या पुढाकारातून आणि नगर पंचायतच्या सर्वानुमते ठरावाद्वारे या चौकास मंजुरी मिळाल्याबद्दल,शिक्षक कॉलनीतील नागरिकांच्या वतीने कृतज्ञता सोहळा व सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

**विकासासाठी आम्ही कटिबद्ध मान्यवरांचे प्रतिपादन**

यावेळी सत्काराला उत्तर देताना हारुणभाई इनामदार यांनी शिक्षक कॉलनीतील रस्ते,नाली, लाईट डीपी व इतर नागरी सुविधांच्या पूर्ततेचे आश्वासन दिले. नगराध्यक्षा डॉ.सौ. सिताताई बनसोड यांनी आपल्या मनोगतात म्हटले की,शिक्षक कॉलनी भागातील समस्या सोडवण्यासाठी मी प्रामाणिक प्रयत्न करेन. तर नगरसेवक अझहर भाई इनामदार यांनीही या भागाच्या विकासासाठी पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक बाबासाहेब केदार सर यांनी केले,तर आभार प्रदर्शन प्राध्यापक मुकुंद मुळे सर यांनी केले. या प्रसंगी मान्यवरांचा सत्कार प्रकाश मुंडे, खय्युम शेख,अमोल धस, अमोल घुले,रवी घुले, अमोल मुंडे,पप्पू गायकवाड,रणजित घुले आणि प्रविण साबळे यांच्या हस्ते करण्यात आला.या कार्यक्रमास एम.डी.घुले सर,चंदू चौरे, सोनू धस,महादेवजाधवर, नागरगोजे साहेब,तांबडे सर,रोहित मुंडे,राजेश गवळी सर,बाबा मुंडे सर, गायकवाड ताई यांच्यासह शिक्षक कॉलनीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



संपादकीय

# ग्रंथ हेच गुरू

अलीकडे वाचनाची आवड कमी होऊ लागली आहे असे अनेकजण म्हणतात, ते थोडेफार खरे असले तरी दूरदर्शनमुळे वाचण्याऐवजी ऐकण्यात आणि पाहण्यातच अनेकांचे मन गुरफटून जाते. असे असले तरी केवळ प्रेक्षक वा श्रोता होण्याने सर्वांच्या मनाची भूक भागत नाही. एकदा लहानपणी पुस्तकांशी मैत्री झाली की, ती संगत कधी सुटत नाही. जीवनातले अनुभव अधिक डोळसपणे देण्याची शक्ती पुस्तक आपल्याला देतात. आपलं व्यक्तिमत्त्व अधिक सुजाण संपन्न करतात. 'वाचनालयाविना शाळा म्हणजे शस्त्रागाराविना किल्ला होय' पूर्वीच्या काळी देशाभिमानाने प्रेरित होऊन समाज शिक्षण देण्याच्या उद्देशाने स्थापन केलेली ही ग्रंथालये म्हणजे स्वातंत्र्यप्रेमाची व जागृतीची प्रतीकेच आहेत. 'पुस्तक वाचल्यावर मस्तक तयार होतं आणि मस्तक तयार झाल्यावर माणूस कुठेही नतमस्तक होत नाही,' असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले आहे. आज विद्यार्थ्यांसह पालक, शिक्षक तथा समाजातील सर्वच घटकांचे वाचन कमी होत आहे हे वास्तव आपल्याला नाकारता येणार नाही. वाचनाद्वारे व्यक्तिमत्त्व विकासासाठी अनेक गोष्टी सहाय्यभूत ठरतात. हे जवळपास प्रत्येक यशस्वी क्षेत्रातील तज्ज्ञ तथा अनुभवी व्यक्तींचे मत आहे. आज विद्यार्थी वर्ग केवळ मिळेल त्या साधनांद्वारे फक्त माहिती गोळा करीत आहे. अभ्यासक्रमाशी पूरक असणाऱ्या उपयुक्त वाचनाकडे अनेकांचा कल आहे; परंतु मूळ कलाकृतीचा अभ्यास करण्याकडे, वाचन वाढवण्याकडे अनेकांचे दुर्लक्ष होत आहे. देशाला महासत्ता बनवण्याचे ज्यांनी प्रथम स्वप्न पाहिले ते आपले राष्ट्रपती भारतरत्न भारताचे मिसाईल मॅन डॉक्टर ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या राष्ट्रीय कार्याची दखल म्हणून त्यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिनाच्या रूपात आज सर्वत्र सर्व शाळांमध्ये साजरा करण्यात येतो; परंतु हा एक दिवसाचा कार्यक्रम न राहता त्यात सातत्य राहणे गरजेचे आहे.'वाचाल तर वाचाल, ग्रंथ हेच गुरू, पुस्तक मस्तक घडवतात, प्रसंगी अखंडित वाचीत जावे अशी अनेक वाक्य कानावर येतात. पण कोण लक्षात घेतो? मोबाइल, इंटरनेटच्या जमान्यात वाचन दुर्लक्षित झाले का? अन् असेल तर तो खजिना आजच्या विद्यार्थ्यांना कसा उपलब्ध करून देता येईल. आज जे काही विद्यार्थ्यांकडून वाचले जाते ते केवळ पाठ्यपुस्तकांमधीलच. शिक्षक आपले अभ्यासक्रमामध्ये, तर विद्यार्थी त्यांच्या परीक्षेच्या अभ्यासात गुंग, कुणालाच दोष देता येणार नाही. पण जेवण जसे चौरस असावं तसं वाचन देखील चौफेर असावे. सार्वजनिक तसेच महापालिकेची वाचनालये आज ओस पडत असल्याचे दिसते.ज्येष्ठ नागरिक सोडता तरुणांनी वाचनालयाकडे पाठ फिरवली आहे. हा सोशल मीडियाचा परिणाम आहे. काही ठिकाणी वाचक आहेत पण वाचनालयात दर्जेदार पुस्तके, साहित्य ग्रंथ, उपलब्ध नाहीत. बऱ्याच वेळा भरमसाट पुस्तके प्रसिद्ध होतात. त्यातील ठरावीक पुस्तकांची विक्री होते मग वाचन कमी झाले अशी ओरड सुरू होते. या ओरडण्याला तसा अर्थ नाही. हा निराशावादी दृष्टिकोन आहे. असे मला वाटते वाचनाचे अनेक पर्याय सध्या आपल्याकडे आलेले आहेत. पारंपरिक छापील पुस्तकांबरोबर आधुनिक अशा ई-बुक सारख्या पुस्तकांमुळे पुस्तकांचे विश्व अधिकच रुंदावले आहे. किंबहुना यामध्ये रोजच भर पडत आहे. आधुनिक साधनांमुळे कमी जागेत, कमी खर्चात जास्त संख्येने पुस्तकं साठवली जातात. आज ऑनलाईन पुस्तकांच्या माध्यमातून अनेक पुस्तके उपलब्ध आहेत. विविध पुस्तकांवर भरपूर सूट, प्रदर्शन व ऑनलाइन विक्रीमध्ये मिळत असल्याने वाचक पुस्तक खरेदी करणे पसंत करत आहेत. सध्या वाचकांच्या घरी स्वतःची छोटी छोटी वाचनालये उदयास येत आहेत, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. सध्या वाचन संस्कृतीने आपल्या पारंपरिक ढाचा बदलून नवा ढाचा तयार केला आहे. जोपर्यंत मानवाला ज्ञानलालसा आहे तोपर्यंत वाचन संस्कृती लयास जाणे कदापिही शक्य नाही. आताचे जग ऑनलाइन वाचनालयाचे आहे. विविध लेखकांचे ब्लॉग, विविध लेख, पेज, ई-पेपर याद्वारे लेखन वाचकांसाठी उपलब्ध होत आहे. विविध ऑनलाईन ॲप्स, पीडीएफ स्वरूपात उपलब्ध पुस्तके मोबाइलवर उपलब्ध आहेत. यामुळे वाचनालय आपल्या सदैव सोबती अशा परिस्थितीमुळे ग्रामीण व शहरी भागातील वाचनालये सुनी सुनी झाल्याचे आपल्याला पाहायला मिळते. दुसरीकडे मात्र आजही मुंबई-पुणे यांसारख्या शहरात लोकल ट्रेन, एसटी यामध्ये पुस्तके वाचणारी अनेक मंडळी आपल्याला निदर्शनास पडतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त एसटी बसमध्ये वाचनालयाची संकल्पना सध्या पाहायला मिळते. त्याशिवाय पुस्तकांचे गाव भिलार ही याची आदर्श उदाहरणे सांगण्यात येतील.सध्याचे पालक आपल्या पाल्याला इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालणे पसंत करतात. त्यामुळे मराठी विषयाची आवड नसल्याने मराठी वाचनालयाकडे त्यांनी पाठ फिरवली आहे. दुर्दैवाने आपली मराठी अन्य भाषेच्या तुलनेत काहीशी मागे पडत आहे. ती पुढे येणे गरजेचे आहे. आजच्या इंटरनेटच्या आभासी युगात वाचनासाठी उसंत थोडीफार कमी झाली आहे. मोबाइल, फेसबुक, व्हॉट्सॲप विविध मनोरंजनात्मक गेम्स, टीव्हीचे शेकडो चॅनल्स यामुळे मनोरंजनाची अनेक माध्यमे उपलब्ध झाली आहेत. यातून साहित्याची गरज संपुष्टात येईल का? या प्रश्नाचे उत्तर देताना ज्येष्ठ साहित्यिक नागनाथ कोतोपल्लींनी म्हटलंय... उद्या विज्ञान तंत्रज्ञानाने निर्माण केलेल्या गुंतागुंतीतून सुटकेच्या धडपडीसाठी उन्नत अर्थव्यवस्थेने कोंडलेल्या श्वासाला विरोध करण्यासाठी निर्मळ जगण्यास शेवटी माणसाला साहित्याच्या आश्रयाला यावे लागणार. दुसरा आश्रय कोणता असणार आहे. गुगलमुळे पडलेल्या प्रश्नांना क्षणात उत्तर शोधणे सोपे झाल्यामुळे चिकित्सा व चिकित्सकवृत्ती कमी झाली आहे. गेल्या काही वर्षांत रेडिओ, इंटरनेट, दूरचित्रवाणीचा विकास आणि वापर झपाट्याने वाढला पण वृत्तपत्रे आणि पुस्तकांना जगातून हद्दपार करण्यात माध्यमांना यश आलेले नाही, रेडिओद्वारे ऐकू येणारे शब्द व दूरचित्रवाणीवरील चित्रे यांचा मनावर तत्काळ परिणाम होतो पण तो वरवरचा असतो टिकाऊ नसतो. आजही कमी खर्चाचे व चटकन उपलब्ध होणारे ज्ञानाचे साधन म्हणजे पुस्तकेच आहेत.पुस्तके वाचून मोठमोठ्या चळवळी उभ्या केलेल्या व्यक्ती वर्तमानकाळात सुद्धा आपल्यासमोर आहेत. साहित्य संमेलन, प्रबोधनवादी मेळावे यात पुस्तकांची मोठ्या प्रमाणात खरेदी-विक्री होतच असते व आजही अनेक पुस्तके जन्माला येत आहेत. त्यांचा वेग मंदावलेला नाही यावरून जरी वाचनालय सुनी सुनी झाली तरी वाचन कमी झालेले नाही हे लक्षात येते. आजच्या काळात 'वाचाल तर वाचाल' हे बाबासाहेबांचे शब्द सार्थ वाटतात व अनेक वेळा मार्गदर्शक ठरतात. सध्या प्राथमिक शिक्षण स्तरावर विद्यार्थ्यांच्या वाचन, लेखन, क्षमता विकसित करण्यासाठी अनेक प्रकारचे उपक्रम देखील शासनाने हाती घेतले आहेत. आपणही सर्वांनी एक पाऊल पुढे टाकत वाचन संस्कृती जोपासण्यासाठी नियमित वाचन करणे गरजेचे आहे.

# सिंधुदुर्ग पहिला!




हिंदुस्थानच्या गेले अनेक शतकांतल्या विविध आघाड्यांवरच्या पराभवाचं मूळ इथल्या जातिव्यवस्थेत, जातीच्या उतरंडीत आणि भेदाभेदात आहे, हे सर्व विचारसरणीच्या इतिहासकारांना, समाजशास्त्रज्ञांना आता मान्य आहे. ही कमी दूर करण्यासाठी भारतीय समाजजीवनातून जातीचं उच्चाटन केलं पाहिजे, हेही बहुतेक सगळ्या समाजशास्त्रज्ञांनी, राजकीय नेत्यांनी स्पष्टपणे मांडून झालं आहे. त्या दिशेने अनेक समाज सुधारकांनी गेलं शतक-दीड शतक प्रयत्नही केले आहेत. यातल्या काहींना धर्मचिकित्सेशिवाय ते शक्य नाही, असं वाटत होतं; म्हणून त्यांनी धर्मचिकित्सेचा मार्ग स्वीकारला. काहींनी पुरोहित शाहीवर आघात केले, काहींनी पुनर्जन्माची कल्पना पुसण्याचा प्रयत्न केला, काहींनी जन्म-मृत्यूच्या निसर्गचक्राला वैज्ञानिक परिभाषेत उलगडून सांगण्याचा प्रयत्न केला. काहींनी जातिभेद मिटवण्यासाठी सहभोजन, मंदिर प्रवेशांचे कार्यक्रम आखले, तर काहींनी आंतरजातीय विवाहांशिवाय ही व्यवस्था मोडीत काढता येणार नाही, या विश्वासापोटी त्या दिशेने प्रयत्न केले. प्रत्येकाचं उद्दिष्ट एकच होतं; मार्ग भिन्न होते. त्यातून जातींची तीव्रता निवळली. आधुनिक जगण्यानेही त्यात बदल केले. नव्या तंत्रज्ञानाने नव्या अर्थरचना जन्माला घातल्या. त्या अर्थरचनांनी उत्पादक साधनं बदलली. त्याचाही परिणाम घट्ट जाती व्यवस्था काहीशी सैल होण्यात झाला. परस्पर संपर्काच्या, दळणवळणाच्या साधनांनीही यात बराच फरक झाला. बंदिस्त जातीव्यवस्था या सगळ्यामुळे थोडी खुली झाली. पण, तरीही तिची सैल तटबंदी अधिक लवचिक करत ती सांभाळण्याचे प्रयत्नही सुरूच राहिले. देव-देवतांपासून पूजा-अर्चेपर्यंत आणि सणवार, खाण्याच्या सवयींपासून राहणीमानापर्यंत अनेक बाबींनी त्याला आधारच दिला. 'राजकारणातून जात हटवा'पासून 'आरक्षणातून जात हटवा'पर्यंत अनेक लक्षवेधक घोषणाही झाल्या. या सगळ्याला पचवून जात राहिलीच, तेव्हा 'जात नाही, ती जात, अशी जातीची व्याख्या करून अनेकांनी आपले हात टेकले!

जातीचं अस्तित्व व्यक्तीच्या व्यक्तिगत आयुष्यात आणि सार्वजनिक जीवनात अशा दोन पातळ्यांवर असतं. व्यक्तिगत आयुष्यात राज्यसत्तेने किती हस्तक्षेप करायचा, याला मर्यादा आहेत. भारतीय संविधानानेच व्यक्तीला तसं संरक्षण दिलं आहे. त्यामुळे, अनेक सामाजिक आजारांचं मूळ असलेल्या या जातीला नागरिकांच्या वैयक्तिक आयुष्यातून हटवायचं असेल, तर ते पूर्णतः व्यक्तीच्या तशा निवडीनेच होऊ शकेल. व्यक्तीला त्यासाठी प्रवृत्त करावं लागेल. प्रबोधन हाच त्यासाठी प्रभावी उपाय आहे. पण, सार्वजनिक जीवनातल्या अशा बाबींच्या नियंत्रणात, अंमलबजावणीत राज्यसत्तेला हस्तक्षेप करणं सहज शक्य आहे. कायदे, नियम, तरतुदींची अनेक आयुधं त्यासाठी लोकनियुक्त सरकारकडे आहेत. सार्वजनिक जीवनातील जातीचं अस्तित्व, तिचा उल्लेख आणि प्रभाव कमी करण्यासाठी जातीवाचक बाबी हटवणं हा एक मार्ग आहे. सरकार जाती निर्मूलनासाठी खरोखर प्रामाणिक असेल, तर आपल्या राजकीय इच्छेने, शासन अधिकारात सरकार या बाबी निश्चितच करू शकतं. शहरांची आणि शहरातील भागांची, ग्रामीण भागात गावांची किंवा गावातील विविध भागांची जातीवाचक नाव हटवणं, हे अशा प्रयत्नातील महत्त्वाचं पाऊल ठरू शकतं. महाराष्ट्रात सरकारने तशा प्रकारचा निर्णय घेतला असून सर्व जिल्ह्यांना त्यासाठी मार्गदर्शक पद्धती, नावांची निवड करण्याबाबत द्यायचे प्राधान्यही कळविले आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्याने सोमवारी याबाबतचा क्रांतिकारक निर्णय घेतला असून जिल्ह्यातील १९२ वस्त्यांची आणि २५ रस्त्यांची नांवं बदलण्याचं ठरवलं आहे. पालकमंत्री नितेश राणे आणि जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे या दोघांचंही त्यासाठी संपूर्ण महाराष्ट्राने विशेष कौतुक केलं पाहिजे.ज्या ज्या ठिकाणी जातीचा निर्देश किंवा सांकेतिक उल्लेख होतो, त्या सर्व ठिकाणी ही काळजी घेणं हीच आधुनिक युगाची कसोटी म्हणता येईल. राज्यात पूर्वी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरस्कार' दिले जात असत. त्याचं नामांतर काही काळापूर्वीच 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार' असं केलं गेलं. 'दलित' असा उल्लेख करण्याऐवजी 'अनुसूचित जाती', 'नवबौद्ध' असा उल्लेख करण्याच्या मार्गदर्शक सूचनाही देण्यात आल्या. सरकारी कामकाजांत तशी काळजी घेतली जाते. माध्यमांतही या संदर्भातील बदल झाले. गाव, शहरं, रस्त्यांची जातीवाचक नांवं बदलण्याबाबत तामिळनाडू सरकारने एप्रिल महिन्यात निर्णय घेऊन या महिन्यात त्यासाठीची कालमर्यादाही घालून दिली. महाराष्ट्र सरकारने कालमर्यादा, वेळापत्रक दिलं नसलं, तरी धोरणात्मक निर्णय घेतला आहे. सरकारच्या या दिशानिर्देशानंतर संपूर्ण जिल्ह्यासाठी असा निर्णय घेण्याचं क्रांतिकारक पाऊल केवळ सिंधुदुर्ग जिल्ह्यानेच उचललं असल्याचं दिसतं आहे. तुकड्यातुकड्यांनी अनेक ठिकाणी बदल झाले असतील. यापुढेही होतील. पण, एखादा कालसुसंगत निर्णय घेतल्यानंतर त्याची धडाकेबाज अंमलबजावणी करण्यासाठी वैचारिक स्पष्टता असावी लागते. राजकीय नेतृत्वाने पुढाकार घेतला, तर प्रशासनालाही त्याच्या अंमलबजावणीसाठी हुरूप येतो. सिंधुदुर्गात आपल्याला तेच दिसतं आहे. थोडं या निर्णयापलीकडे पाहिलं, तर आजच्या युवा नेतृत्वामध्ये मत्स्य व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांची तडफ, विकासाची दृष्टी आज संपूर्ण महाराष्ट्रात वाखाणली जाते आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोपवलेल्या जबाबदारीचं ते ज्या पद्धतीने सोनं करताहेत, ते पाहून हे दोन्ही विभाग हिरीरीने कामाला लागले आहेत. त्याचा लाभ महाराष्ट्रातील त्या व्यवसायातील नागरिकांना होतो आहे. आपल्या या 'धडक निर्णय, तडक अंमलबजावणी' शैलीचा प्रत्यय त्यांनी सामाजिक विषयातही दाखवला असल्याने महाराष्ट्राच्या इतिहासात त्याची कायमस्वरूपी नोंद होणार, हे निश्चित.

# वैद्यकीय प्रवेश प्रक्रियेत अशीही 'घुस'खोरी

वैद्यकीय क्षेत्रात महत्त्वाचे मानले जाणारे एमबीबीएस शिक्षण प्राप्त व्हावे, या दृष्टीने लाखो विद्यार्थी व पालक जीवाचे रान करतात. विशेष म्हणजे अभ्यासाबरोबरच यासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांची जुळवाजुळव इयत्ता अकरावीपासूनच करावी लागते. अशा परिस्थितीत आपल्या राज्यात परराज्यातील विद्यार्थ्यांनी येऊन आपल्या हक्काची जागा बळकावत आहेत. हे प्रकरण मराठवाड्यातील विद्यार्थ्यांनी उघडकीस आणले व यामुळे अशा गैरप्रकाराने महाराष्ट्रात घुसखोरी केलेल्या परराज्यातील १५२ विद्यार्थ्यांना राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे नोटीस बजावण्यात आली.महाराष्ट्रातील वैद्यकीय प्रवेशाची तिसरी फेरी सुरू आहे. तिसऱ्या फेरीची अस्थाई गुणवत्ता यादी जाहीर केल्यानंतर नवीन इच्छुक विद्यार्थ्यांनी आपला प्रवेश अर्ज भरला; परंतु या नवीन इच्छुक विद्यार्थ्यांच्या कागदपत्राबाबत मराठवाड्यातील विद्यार्थ्यांनी सीईटी कक्षाकडे तक्रारी केल्या. त्या तक्रारीची सीईटी कक्षाने प्राथमिक तपासणी केली असता त्यामधील १५२ विद्यार्थ्यांनी अपलोड केलेली कागदपत्रे चुकीची असल्याचे आढळून आले आहे. मराठवाड्यातील विद्यार्थ्यांनी जागरूकता दाखवून हे प्रकरण उघडकीस आणले असले तरी आतापर्यंत महाराष्ट्रात हजारो विद्यार्थ्यांनी या पद्धतीने प्रवेश मिळवत वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले असल्याची दाट शक्यता आहे. हा प्रकार केवळ मराठवाड्यातील विद्यार्थ्यांवर अन्याय करणारा नसून यामुळे महाराष्ट्रातील अनेक गरजू व इच्छुक विद्यार्थ्यांवर मोठा अन्याय झालेला आहे. वैद्यकीय प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या १५२ विद्यार्थ्यांना नोटीस बजावण्यात आली, इथपर्यंत ठीक असले तरी राज्यात अशा गैरमार्गाने वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश मिळवून देणारे काही खूप मोठे रॅकेट कार्यरत आहे. महाराष्ट्रात एमबीबीएस प्रवेशासाठी तिसऱ्या फेरीची अस्थायी गुणवत्ता यादी जाहीर झाल्यानंतर काही विद्यार्थ्यांच्या कागदपत्राबाबत सीईटी कक्षाकडे तक्रारी प्राप्त झाल्यानंतर सीईटी कक्षाने या तिसऱ्या फेरीमध्ये ज्या विद्यार्थ्यांनी आपला प्रवेश अर्ज भरला त्यांच्या सर्व कागदपत्राची तपासणी केली असता त्यातील १५२ विद्यार्थ्यांची कागदपत्रे चुकीची असल्याचे प्रथमदर्शी आढळून आले. मराठवाड्यातील काही जागरूक विद्यार्थी व पालकांनी याबाबत मुळाशी जाऊन जवळपास चौदाशे नऊ पानांच्या विद्यार्थ्यांच्या यादीचा अभ्यास केला. त्या यादीत असलेली नावे महाराष्ट्र बाहेरील आहेत हे सिद्ध झाले. एवढेच नव्हे तर त्या यादीतील अनेकांनी परराज्यात प्रवेश मिळविला. तो प्रवेश त्यांनी स्वतःच्या राज्यासाठी राखीव असलेल्या कोट्यातून मिळविला होता.



म्हणजेच ते विद्यार्थी त्या राज्यातील रहिवासी आहेत हे सिद्ध होते. मग असे असताना त्या परराज्यातील विद्यार्थ्यांनी पुन्हा महाराष्ट्राच्या राखीव कोट्यात असलेल्या प्रवेशाच्या यादीत कसे स्थान मिळविले? हा खूप मोठा प्रश्न आहे. याचाच अर्थ ही सर्व प्रक्रिया पाहणारी यंत्रणा सपशेल अपयशी आहे, हे देखील सिद्ध होते. मराठवाड्यातील पालक व विद्यार्थ्यांनी याबाबत आवाज उठविल्यानंतर सीईटी कक्षाने या १५२ विद्यार्थांना याबाबत ईमेलद्वारे नोटीस पाठविण्यात आली. या विद्यार्थ्यांना परत मूळ व मूळ कागदपत्रे सीईटी कक्षाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्याच्या सूचना दिल्या आहेत. जे विद्यार्थी त्यांची मूळ कागदपत्रे अपलोड करणार नाही, त्या विद्यार्थ्यांचा समावेश तिसऱ्या वैद्यकीय प्रवेश फेरीत समावेश होणार नाही. राजस्थानमधील तब्बल ६० विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राचे रहिवासी असल्याचे खोटे प्रमाणपत्र तयार करून वैद्यकीय प्रवेश प्रक्रियेत घुसखोरी केल्याचे गंभीर प्रकरण मराठवाड्यातील नांदेड येथील विद्यार्थ्यांनी समोर आणले. या बनावट रहिवासी प्रमाणपत्रांच्या आधारे त्यांनी एमबीबीएस प्रवेशासाठी पात्र विद्यार्थ्यांच्या यादीत स्थान मिळवले. घुसखोरी करत त्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रातील वैद्यकीय महाविद्यालयांत प्रवेश घेण्याची तयारी सुरू केली होती. या प्रकारामुळे महाराष्ट्रातील खऱ्या विद्यार्थ्यांवर अन्याय झाल्याची भावना व्यक्त होते. या विषयावर मराठवाड्यातून आवाज उठविण्यात आला. मुख्यमंत्री, राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री आणि केंद्रीय मंत्र्यांनी तत्काळ लक्ष घालण्याची मागणी करण्यात आली. संपूर्ण देशभरातील वैद्यकीय अभ्यासक्रमांसाठी प्रवेश देताना १५ टक्के ऑल इंडिया कोटा राखीव असतो, तर उर्वरित ८५ टक्के जागा संबंधित राज्यातील स्थानिक विद्यार्थ्यांसाठी असतात.सध्या तिसऱ्या फेरीची प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. याच प्रक्रियेत राजस्थान, उत्तर प्रदेश, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, हरियाणा, पंजाब, गुजरात आणि केरळ या राज्यांतील शेकडो विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रात प्रवेश मिळवण्यासाठी खोटे रहिवासी प्रमाणपत्र सादर केल्याचे समोर आले आहे. विशेष बाब म्हणजे या विद्यार्थ्यांपैकी अनेकांनी पूर्वी त्यांच्या मूळ राज्यात विविध प्रवर्गातून प्रवेश मिळवलेला आहे. असे असताना देखील महाराष्ट्रात मात्र नवीन ओबीसी किंवा इतर आरक्षण प्रवर्गांचा त्या विद्यार्थ्यांनी आधार घेतल्याचे उघड झाले आहे. उदाहरण द्यायचे झाले तर राजस्थानमधील काही विद्यार्थी त्यांच्या राज्यात अनुसूचित जाती (डउ) प्रवर्गातून पात्र ठरले होते, पण तेच विद्यार्थी महाराष्ट्रात ओबीसी प्रवर्गातून पात्र ठरल्याचे दिसते, या प्रकरणावरून मराठवाड्यातील जागरूक पालक व विद्यार्थ्यांनी याबाबत आवाज उठविला.चुकीच्या पद्धतीने वैद्यकीय प्रवेश मिळवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे तर फावते; परंतु जे खरोखर एमबीबीएसला प्रवेश घेण्यासाठी आपल्या महाराष्ट्रातील विद्यार्थी पात्र आहेत अशांवर खूप मोठा अन्याय होतो. भविष्यात अशा फसवणुकीच्या माध्यमातून वैद्यकीय क्षेत्रात घुसणारे विद्यार्थी गुन्हेगारी प्रवृत्तीचे डॉक्टर म्हणून समाजात वावरू शकतात. महाराष्ट्र शासनाने अशा विद्यार्थ्यांची तत्काळ चौकशी करून, त्यांना प्रवेश प्रक्रियेतून बाद करावे. चुकीच्या पद्धतीने एमबीबीएसला प्रवेश मिळवू पाहणाऱ्या विद्यार्थ्यांवर तसेच त्यांच्या पालकांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी मराठवाड्यातील विद्यार्थी व पालकांनी केली आहे. अशा विद्यार्थ्यांना किमान पाच ते सहा वर्षांसाठी वैद्यकीय शिक्षणापासून निलंबित करण्याची मागणीही पुढे आली आहे. सर्वोच्च न्यायालयानेही पूर्वी अशाच प्रकारच्या फसवेगिरीच्या प्रकरणात आरोपी विद्यार्थ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले होते.

# न्यायालयात विरोधात साक्ष का दिली ? म्हणुन कोयता कुऱ्हाडीने केला हल्ला, ११जणांविरुद्ध गून्हा दाखल

दैनिक वादळ वार्ता
**केज | प्रतिनिधी**

केज न्यायालयात चालु आसलेल्या प्रकरणात आमच्या विरोधात साक्ष का दिली? या कारणा वरून ११ जणांनी एकाच कुटुंबातील ७ जणांवर कोयता,कुऱ्हाडीचा तुंबा व काठीने हल्ला केल्या प्रकरणी पोलीस अधीक्षक यांच्या आदेशावरून तब्बल ९ महिन्या नंतर जयश्री काकडे याच्या फिर्यादी वरून अकरा जणांविरुद्ध केज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.या बाबत सविस्तर माहिती अशी की,दि.१८ मार्च २०२५
रोजी रामभाऊ काकडे आणि त्यांचे कुटुंबीय शेतात काम करीत असताना,केज न्यायालयात न्यायप्रविष्ठ असलेल्या प्रकरणी आमच्या विरुद्ध साक्ष का दिली ? या कारणावरून भावकीतीलच ११जणांनी कोयता,कुऱ्हाडीचा तुंबा व काठीने सात जणाला मारहाण केली होती.या प्रकरणी जयश्री काकडे यांनी केज येथील पोलीस अधिकाऱ्याकडे तक्रार दिली होती.परंतु या प्रकरणी गून्हा नोंद झाला नव्हता.त्यामुळे जयश्री काकडे यांच्या वतीने त्यांच्या नातेवाईकांनी पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांची भेट घेवून आरोपीविरुद्ध गून्हा नोंद करण्याची मागणी केली होती.त्यावर पोलिसांनी सखोल तपास करून गून्हा दाखल करण्याचे आदेश पोलीस अधीक्षकांनी दिले होते. केज पोलिसांनी या प्रकरणी सखोल चौकशी करून शुक्रवार दि.२६ डिसेंबर २०२५ रोजी जयश्री काकडे यांच्या फिर्यादीवरून संगनमत करून व मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी राजाभाऊ मारूती काकडे, बालासाहेब मारूती काकडे,बाबासाहेब मारूती काकडे,गोकुळ बालासाहेब काकडे, हरीओम राजाभाऊ काकडे,लक्ष्मी बालासाहेब काकडे,अनुराधा बाबासाहेब काकडे,विद्या राजाभाऊ काकडे, सुदामती मारूती काकडे, रुक्मिण हनुमंत साखरे आणि पुजा राजाभाऊ काकडे या ११जणांविरुद्ध केज पोलिसात गून्हा नोंद करण्यात आला आहे.
पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शना खाली पोलिस उप निरीक्षक उमेश निकम हे पुढील तपास करीत आहेत.दरम्यान या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.




## मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री.किशोर काळे यांची बोरफडी आदर्श ग्रामपंचायतला भेट

दैनिक वादळ वार्ता
**बीड | प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील आदर्श गाव मौजे बोरफडी येथे शुक्रवार दिनांक २६ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ७-०० वाजता मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत उत्स्फूर्तपणे सहभाग घेतलेल्या आदर्श ग्रामपंचायत बोरफडी येथे भेट देऊन गावात राबविण्यात आलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची पाहणी करण्यात आली यामध्ये प्लास्टिक बंदी, बचत गट,घरकुल, आयुष्यमान भारत कार्ड वाटप,अनिमिया मुक्त गाव,ग्रामपंचायत अंतर्गत सीसीटीव्ही कॅमेरे यांसह इतर खासकरून उपक्रम राबवलेले आहेत. महाराष्ट्रामध्ये मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत राज्यात ३७३९७ ग्रामपंचायत तिने सहभाग नोंदवला आहे. जी ग्रामपंचायत उत्कृष्ट काम करील त्या घटकात त्या इंडिकेटर वरती काम करील त्यांना राज्यात पाच कोटी रुपयांचे बक्षीस मिळणार आहे.
यामध्ये राज्यस्तरीय जिल्हास्तरीय,तालुका स्तरीय बक्षीसास पात्र ग्रामपंचायत होणार आहे त्याच धर्तीवर आदर्श ग्राम पंचायत बोरफडीने देखील सहभाग नोंदवून सर्व इंडिकेटर पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे.त्याच अनुषंगाने ग्रामपंचायत बोरफडीचे दप्तर,नाविन्यपूर्ण केलेले कामे व नागरिकांना देत असलेल्या सुख सुविधा हे सर्व पाहण्यासाठी बीड जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. किशोर काळे यांनी त्यांच्या टीम सोबत भेट देऊन समाधान व्यक्त करून गावात शाश्वत विकास करण्याच्या सूचना दिल्या.यावेळी त्यांच्यासोबत बीड पंचायत समितीचे विस्तार अधिकारी अरुण मोरे, मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाचे वॉररूम सनियंत्रक तथा जिल्हा व्यवस्थापक अशोक खरसाडे आदि टीम सहित बोरफडी ग्रामपंचायत चे आदर्श सरपंच कैलास घुगे युवाउद्योजक सुनील कुटे, गोरख घुगे,वचिष्ठ कुटे, बिभीषण घुगे,जयवंत ठोंबरे,कृष्णाघुगे,रामभाऊ गाडे,सिध्देश्वर घुगे यांच्या सह ग्रामपंचायत सदस्य ग्रामपंचायत अधिकारी विवेक गिते कृषीसहाय्यक खामकर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## बीड जिल्ह्यातील हक्काचा जनकल्याण महामार्ग हिरावून घेऊ नका–अनिल बोर्डे

दैनिक वादळ वार्ता
**गेवराई | प्रतिनिधी**

राज्यातील महत्वकांक्षी लातूर- कल्याण द्रुत गती महामार्ग हा बीड जिल्ह्याचा विकासाचा कणा आहे त्यामध्ये बदल करण्यात येऊ नये अशी मागणी बीड जिल्हा ग्राहक पंचायत उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केले ली आहे.



राज्यातील महत्त्वकाक्षी लातूर- कल्याण द्रुतगती महामार्ग हा जिल्ह्याच्या विकासाचा वरदान ठरणारा असून राजकीय दबावा पोटी या मार्गाची दिशा बदलण्याचा प्रयत्न झाल्यास बीड जिल्ह्याच्या विकासासाठी दुर्दैवी ठरेल. तरी मूळ प्रस्तावाप्रमाणे हा मार्ग लातूर - आंबेजोगाई -केज- अहिल्यानगर मार्गे कल्याण असाच राबविण्यात यावा अशी मागणी बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र यांच्या वतीने करण्यात येत आहे.
बीड जिल्हा आधीच दुष्काळ बेरोजगार स्थलांतराचे गंभीर प्रश्न स्वरूपाचा सामना करीत आहे .अशा परिस्थितीत हा मार्ग जिल्ह्यासाठी संजीवनी ठरणार आहे . या मार्गामुळे शेतकऱ्याचा मुंबई, पुणे सारख्या बाजारपेठेत लवकर शेतकरी ग्राहकाचा माल पाठवणे शक्य होणार असून औद्योगिक गुंतवणूक व रोजगार निर्मितीला मोठी चालना मिळणार आहे .परंतु गेल्या काही दिवसापासून हा मार्ग धाराशिव जिल्ह्याकडे वळविण्यासाठी लोकप्रतिनिधीकडून राजकीय दबाब टाकला जात आहे. असे समजते ही बाब दुर्दैवी आहे आणि बीड जिल्ह्यावर अन्याय करणारी आहे.
बीड जिल्ह्याला जाणून बुजून विकासापासून वंचित ठेवण्यात ठेवण्याची भावना ग्राहकांमध्ये निर्माण होत आहे यातून मोठा असंतोष पसरत आहे.
नियोजित मार्गात बदल करणे जिल्ह्याच्या भविष्याशी खेळण्यासारखे आहे अशी भावना बीड जिल्ह्यातील ग्राहकाची झाली आहे .तरी महाराष्ट्र संतुलित विकासात कोणत्याही जिल्ह्यावर अन्याय होणार नाही अशी भावना निर्माण होऊ नये अशी मागणी बीड जिल्हा ग्राहक पंचायत बीड जिल्हा उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे केलेली आहे.

## केज येथे राष्ट्रसंत भगवान बाबा पुण्यतिथी निमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**केज | प्रतिनिधी**

राष्ट्रसंत ह.भ.प.भगवान बाबा यांच्या पुण्यतिथी निमित्त केज शहरात भव्य अखंड हरिनाम सप्ताह आयोजित करण्यात आला आहे.हा सप्ताह भक्तिमय वातावरणात उत्साहात साजरा होत असून रामकथा सह विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



कार्यक्रमाच्या प्रारंभी हरिनाम जप,कीर्तन, प्रवचन व भजन सेवेने सप्ताहाची सुरुवात झाली.सप्ताहकाळात राज्यातील नामवंत कीर्तनकार व प्रवचनकार सहभागी होत असून दररोज सकाळी व सायंकाळी धार्मिक कार्यक्रम पार पडत आहेत.रवीवारी रात्री ८ते १० यावेळेत ह.भ.प. शिवकन्या ताई चौरे आळंदी देवाची यांचे किर्तन संपन्न झाले असून सोमवारी ह.भ.प.पांडुरंग महाराज मुंडे शेषाबाई मठ संस्थान तांबवा,मंगळवार रोजी ह.भ.प.नंदिता ताई मैंद आई साहेब मठ संस्थान महासांगवी पाटोदा,बुधवारी ह.भ.प. जालिंदर महाराज नेहरकर केज, गुरुवारी ह.भ.प. विष्णु महाराज थोरात कुंबेफळ,शुक्रवारी ह.भ.प.दिपक महाराज मेटे लहुरी,शनिवारी ह.भ.प.ज्ञानदेव बापु महाराज केज,तसेच रविवारी सकाळी ठीक
१० ते १२ यावेळेत साधु शिवराम पुरी मठ संस्थान वरपगाव मठाधिपती महंत ह.भ.प.भगवान महाराज शास्त्री यांचे काल्याचे किर्तन होणार आहे.अखंड हरिनाम सप्ताहाच्या दरम्यान ग्रामस्थ व भाविकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती असून परिसर भक्ती रसात न्हाऊन निघाला आहे.सप्ताहाच्या शेवटच्या दिवशी काल्याचे कीर्तन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.समस्त ग्रामस्थ व परिसरातील भाविकांनी या भक्तीमय सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजक ह.भ.प.ज्ञानदेव बापुनेहरकर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड मार्फत शासकीय आय.टी.आय.कॉलेज सोनपेठ येथे एक दिवसीय स्मार्ट निवेशक जागरूकता कार्यक्रम संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**सोनपेठ | प्रतिनिधी**




भारत सरकारच्या भारतीय प्रतिभूती व विनिमय बोर्ड अर्थात (सेबी) तसेच सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड मार्फत शासकीय आय.टी.आय. कॉलेज सोनपेठ येथे एक दिवसीय स्मार्ट निवेशक जागरूकता कार्यक्रम आय.टी.आय च्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आला.कार्यक्रमाचे आयोजन कॉलेजचे प्राचार्य श्री.आर.व्ही. धानोरकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून (सेबी) तसेच सी.डी.एस.एल चे सेक्युरिटीज मार्केट ट्रेनर श्री.गणेश चौधरी सर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना आर्थिक नियोजनाचे मार्गदर्शन केले.यात त्यांनी विद्यार्थ्यांना सेबी तसेच सी.डी.एस.एल ची कार्य प्रणाली विशद केली. तसेच बचत व बचतीचे महत्त्व समजावून सांगितले.राष्ट्रीयकृत बँकेत असलेल्या विविध योजना,डिमॅट अकाउंट, शेअर मार्केट,म्युच्युअल फंड व इतर शासकीय योजनांचे मार्गदर्शन केले. तसेच गुंतवणूक करत असताना विद्यार्थ्यांनी काय काळजी घ्यावी व फसवणूक करणाऱ्या योजनांपासून सावध राहण्याच्या सूचना दिल्या. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी श्री.जी. बी.देशमाने,उघडे व्ही.बी. सर,इगारे यु.एल.सर,शेख ए.एच.सर,कुटवाड एस. एम.सर यांनी विशेष परिश्रम घेत कार्यक्रमाचे आयोजन केले तर सूत्र संचालन श्री.जी.बी. देशमाने सर यांनी या कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गप्पेवाडीतील बाराभाई व महादेव वस्ती रस्त्याच्या कामास सुरुवात,दत्तात्रय (पिंटू) ठोंबरे यांच्या हस्ते शुभारंभ



दैनिक वादळ वार्ता
**केज | प्रतिनिधी**

विडा जिल्हा परिषद गटा तील गप्पेवाडी गावासाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या विकास कामास अखेर सुरुवात झाली आहे. गप्पेवाडी येथील बाराभाई वस्ती आणि महादेव वस्ती येथील बहुप्रतीक्षित रस्त्याच्या कामाचा शुभारंभ विडा जिल्हा परिषद गटाचे भावी जिल्हा परिषद उमेदवार दत्तात्रय (पिंटू) ठोंबरे तसेच भावी पंचायत समिती उमेदवार सुरज पटाईत यांच्या माध्यमातून करण्यात आला.या विकास कामासाठी गप्पेवाडी येथील युवा नेते अर्जुन केदार यांनी सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे हा प्रश्न मार्गी लागला असल्याचे सांगण्यात येत आहे. रस्त्याच्या कामाचा शुभारंभ श्रीफळ फोडून करण्यात आला.यावेळी रामदास केदार,बळीराम केदार,हनुमंत केदार, बबन केदार,पांडुरंगकेदार, दत्तात्रय केदार,सचिन काळे,संतोष केदार,रमेश केदार,माजी सरपंच वचिष्ठ केदार,महादेव केदार,कृष्णा चौरे, चांगदेव केदार यांच्यासह ग्रामस्थ व तरुण मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती.

## महामार्गावरून होणाऱ्या धोकेदायक भुसा व बगॅस वाहतुकीला जबाबदार कोण ?




**भुसा वाहतूक करणाऱ्या वाहनातून भुसा उडून तो दुचाकी स्वरांच्या डोळ्यात गेल्याने अपघात होण्याचा धोका आहे आणि अशा वाहनावर कारवाई करायला हवी.– दुचाकी चालक**

दैनिक वादळ वार्ता
**गौतम बचुटे | केज**

महामार्गा वरून धोकेदायक आणि बेशिस्त पद्धतीनेभुसा व बगॅस वाहतूक होत असून त्यावर आर टी ओ किंवा प्रशासनाचे नियंत्रण नाही. प्रमाणापेक्षा आणि वाहनाच्या आकार मानापेक्षा आणि रहदारी आणि इतर वाहने व दुचाकीस्वार यांच्या जीविताला धोका निर्माण होत असताना आर टी ओ आणि पोलिस त्यांच्यावर कारवाई करायला का धजावत नाहीत? असा प्रश्न सामान्य नागरिकांना पडला असून या कारवाई न करण्यामागे राजकीय किंवा प्रशासकीय दबाव असावा अशी चर्चा सुरू आहे.
रहदारीचे आणि सुरक्षेचे सर्व नियम वेशीला टांगून महामार्गा वरून आणि शहरातून भुसा आणि बगॅस लोकांच्या डोळ्यात फेकीत गाठोडे बांधल्या सारख्या पद्धतीने अत्यंत धोकेदायक आणि अपघात घडवून लोकांच्या जीवेताला धोका निर्माण होईल अशा पद्धतीने भुसा वाहतूक करणारी वाहने सर्रास वाहतूक करीत आहेत. मात्र त्याकडे परिवहन विभागाचे लक्ष नाही. अशा धोकेदायक आणि अपघात घडून लोकांच्या जीविताला धोका निर्माण करणाऱ्या वाहनांना विरुद्ध कारवाई करण्यास परिवहन विभाग कारवाई करण्यास का कचरत असावा ? कारण न गॅस वाहतूक करणारी वाहने ही एक तर राजकीय व्यक्तींची किंवा अधिकाऱ्यांशी संबंधित असावीत. अशी चर्चा सुरू आहे.अशी वाहने वाहतूक करीत असताना आर टी ओ यांच्या नजरेत का येत नाही. कारवाईसाठी त्यांचे हात का आखडले आहेत. अशी नागरिकांतून चर्चा ऐकायला येत आहे.

## कासा येथील साई सिद्धी हौसिंग सोसायटीतील एटीएम मशीनवरून सोसायटीचा वाद सहाय्यक निबंधक कार्यालयात तक्रार

दैनिक वादळ वार्ता
**पालघर | प्रतिनिधी**




डहाणू तालुक्यातील कासा येथील साय सिद्धी को. ऑप. हौसिंग सोसायटी लि. मधील एटीएम मशीन बसवण्यावरून वाद निर्माण झाला असून, या प्रकरणाची दखल सहकारी संस्थांच्या सहाय्यक निबंधक कार्यालयाने घेतली आहे. सोसायटीच्या सभासदांच्या हरकती लक्षात घेता संबंधित प्रकरणात नियमानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.
मिळालेल्या माहितीनुसार, साई सिद्धी हौसिंग सोसायटीच्या मोकळ्या जागेत बँक ऑफ बडोदा यांचे एटीएम मशीन बसवण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. मात्र, यासाठी सोसायटीची सर्वसाधारण सभा, सभासदांची संमती तसेच आवश्यक परवानग्या घेण्यात आल्या नसल्याचा आरोप सभासदांकडून करण्यात आला आहे.
सोसायटीतील रहिवाशांनी एटीएममुळे होणारी गर्दी, सुरक्षिततेचा प्रश्न तसेच परिसरातील शांततेवर होणारा परिणाम याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. यापूर्वीही सदर इमारतीच्या परिसरात बँकेचे ग्राहक सेवा केंद्र कार्यरत असून, त्याठिकाणी नियमितपणे गर्दी होत असल्याचे सभासदांचे म्हणणे आहे.या पार्श्वभूमीवर सहकारी संस्थांच्या सहाय्यक निबंधक, पोलीस प्रशासन यांच्या कडेही तक्रारी केल्या आहेत. कासा चारोटी येथे एटीएम मशिनमध्ये चोरीचे प्रकार घडले आहेत. तलासरी येथे एटिएम सुरक्षा रक्षकावर अपप्रकार घडला होता त्यामुळे सोसायटी मध्ये ए टीएम बसवन्याला सभासदांकडून याला विरोध होत असल्याचे गीता शेट्टी यांनी सांगितले.प्रकरणाची पुढील चौकशी सुरू असून, अंतिम निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मानव जन्म दुर्लभ;जन्म-मृत्यूच्या फेऱ्यातून मुक्त होण्या साठी 'सदभक्ती' आवश्यक: संत रामपाल जी महाराज

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**



तऱ्हाडी (ता. शहादा) येथील श्री स्वामी समर्थ केंद्राच्या भव्य सभागृहात २८ रोजी संत रामपाल जी महाराज यांच्या जिल्हास्तरीय सत्संगाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यासाठी नंदुरबार जिल्ह्यासह आसपासच्या परिसरातून शेकडो अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मानव जन्म हा गेल्या जन्मीच्या पुण्याईमुळे मिळतो, तो व्यर्थ न घालवता खऱ्या परमात्म्याची भक्ती करून मोक्ष मिळवा, असा मोलाचा संदेश या सत्संगातून देण्यात आला. सत्संगाच्या सुरुवातीला संत रामपाल जी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात आलेल्या विविध समाजोपयोगी उपक्रमांची माहिती देण्यात आली. हरियाणा, जम्मू-काश्मीर, राजस्थान आणि पंजाब या राज्यांमध्ये अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले होते. या संकटकाळात महाराजांनीं केलेल्या मदतीची आणि त्याबद्दल विविध स्तरांवरून त्यांचा जो सन्मान झाला, त्याबद्दलची एक माहितीपट भाविकांना दाखवण्यात आला. अध्यात्मासोबतच सामाजिक बांधिलकी कशी जपली जाते, याचे उत्तम उदाहरण यावेळी मांडण्यात आले.

सत्संगादरम्यान महाराजांनी काही महत्त्वपूर्ण दोह्यांच्या माध्यमातून मानवी जीवनाचे गुपित उलगडून सांगितले. ते म्हणजे

माणूस जनम दुर्लभ हे, मिलें ना बारंबार।
जसे तरोवर से पत्ता तूट बहूर, फिर लागता ना डार।।

अर्थात मानवीय जन्म अत्यंत दुर्मिळ आहे, तो पुन्हा पुन्हा मिळत नाही. ज्याप्रमाणे झाडावरून एकदा पान गळून पडले की ते पुन्हा फांदीला जोडले जाऊ शकत नाही, तसेच हा देह सुटला आणि आपण जिवंतपणी भक्ती केली नाही, तर पुन्हा ८४ लक्ष योनींच्या जन्म-मृत्यूच्या चक्रात अडकावे लागते.त्यामुळं रामपालजी महाराज यांनी सांगितले की,

राम नाम रटते रहो जबतक घट में प्राण।
कबंहु तो दिन दयाल के भनक पड़ेगी कान।।

अर्थात जोपर्यंत शरीरात श्वास (प्राण) चालू आहे, तोपर्यंत त्या खऱ्या परमात्म्याचे नामस्मरण आणि भक्ती करत राहा. मृत्यू कधी येईल हे कोणालाही ठाऊक नाही, म्हणून प्रत्येक क्षण भक्तीत घालवणे हिताचे आहे. कधी ना कधी आपली करुणा त्या परमेश्वराच्या कानावर पडेल आणि आपला उद्धार होईल.

शास्त्राधारित भक्तीवर भर:-महाराजांनी आपल्या प्रवचनात स्पष्ट केले की, सध्या अनेक ठिकाणी शास्त्रांच्या (वेदांच्या) विपरीत ज्ञान दिले जात आहे, ज्यामुळे भक्तांची दिशाभूल होत आहे. जर खऱ्या अर्थाने मोक्ष हवा असेल, तर चार वेद, सूक्ष्मवेद आणि चार वेदांचे सार असलेल्या श्रीमद्भगवद्गीतेचा आधार घेणे अनिवार्य आहे. गीतेत सांगितलेल्या शास्त्रसंमत तीन मंत्रांच्या साधनेद्वारेच पूर्ण मोक्ष प्राप्त होऊ शकतो, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

## दोडे गुजर समाजाचा बाळदा येथे संकल्प मेळावा: गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव आणि सामूहिक विवाहाचा मानस

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**



नंदुरबार आणि तापी जिल्ह्यांतील समस्त दोडे गुजर समाज पंच कमेटीच्या वतीने नुकतीच कुकरमुंडा तालुक्यातील बाळदा येथे एका महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. समाजाचे अध्यक्ष बापू पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत शैक्षणिक प्रगती आणि सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.

या बैठकीचे मुख्य उद्दिष्ट नंदुरबार व तापी जिल्ह्यातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करणे हे होते. समाजातील ज्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्रात घवघवीत यश संपादन केले आहे, त्यांचा यथोचित सन्मान करून त्यांना प्रोत्साहन देण्याचा ठराव यावेळी करण्यात आला. तसेच, समाजातील विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या प्रतिभावान बंधू-भगिनींच्या सत्काराचेही नियोजन करण्यात आले आहे.

बदलत्या काळाची गरज ओळखून समाजातील विवाह सोहळे साध्या पद्धतीने आणि कमी खर्चात व्हावेत, या हेतूने सामूहिक विवाह सोहळा आयोजित करण्यासंदर्भात बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. या उपक्रमामुळे समाजातील आर्थिक भार कमी होऊन एकतेची भावना वाढीस लागेल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.

या बैठकीला समाजातील ज्येष्ठ आणि मार्गदर्शक मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती. यात प्रामुख्याने उपाध्यक्ष प्रकाश पाटील, माजी अध्यक्ष वसंत पाटील,प्रमुख मार्गदर्शक निवृत्त वरिष्ठ पोलीस उपायुक्त मुकुटलाल पाटील, डायाभाई चौधरी, यशवंत पाटील. कन्हैया पाटील, कृष्णदास पाटील, नटवरभाई पाटील, हिम्मत पाटील, संजीव चौधरी, भावेश पाटील, प्रशांत पाटील, सुनील पाटील, गोविंद पाटील, मिनल पाटील, भरत पाटील, मोहन पाटील आदींचा समावेश होता.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कांतिलाल पाटील यांनी अत्यंत प्रभावीपणे केले, तर उपस्थितांचे आभार मोहन पाटील यांनी मानले. बाळदा येथील या बैठकीमुळे दोडे गुजर समाजात उत्साहाचे वातावरण असून, आगामी गुणगौरव सोहळ्यासाठी समाज बांधवांनी कंबर कसली आहे.

## नंदुरबारमध्ये बनावट डी इ एफ निर्मितीचा पर्दाफाश शेतीचा अनुदानित युरिया वापरून लाखांची फसवणूक

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**



शेतकऱ्यांसाठी असलेल्या अनुदानित युरियाचा चक्क वाहनांमध्ये वापरल्या जाणाऱ्या बनावट डी इ एफ निर्मितीसाठी वापर होत असल्याचा खळबळजनक प्रकार नंदुरबार जिल्ह्यात उघडकीस आला आहे. कृषी विभागाने धाड टाकून ५ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहादा तालुक्यातील कोंढावळ गावच्या शिवारात रविंद्र वामन निकुंभ यांच्या शेतातील एका कुडाच्या शेडमध्ये हा बेकायदेशीर कारखाना सुरू असल्याची माहिती कृषी विभागाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक स्वप्नील शेळके आणि त्यांच्या पथकाने शनिवारी (दि. २७) रात्री उशिरा छापा टाकला.

या छाप्यात असे दिसून आले की, आरोपी शेतीसाठी वापरण्यात येणाऱ्या 'भारतीय जन उर्वरक परियोजना' या अनुदानित युरियाचा वापर करून, त्यावर प्रक्रिया करून बनावट डी इ एफ द्रव तयार करत होते. हे बनावट द्रव नामांकित कंपन्यांच्या नावाखाली बनावट बकेटमध्ये भरून विक्रीसाठी साठवले जात होते.

### जप्त केलेला मुद्देमाल

बनावट डी इ एफ बकेट: १४२ सीलबंद बकेट (टाटा मोटर्स नाव असलेल्या) आणि १८ बकेट (भारतबेंझ नाव असलेल्या).
मोकळा साठा: सुमारे ५,५०० लिटर बनावट युरिया मिश्रित द्रव पदार्थ (जो जागीच नष्ट करण्यात आला).
यंत्रसामग्री: फिल्टर मशीन, इलेक्ट्रिक मोटार, ग्राइंडर आणि ३०० रिकाम्या बकेट.
अनुदानित युरिया: १० पूर्ण गोण्या आणि ७३ रिकाम्या गोण्या.

या प्रकरणी कृषी विभागाच्या तक्रारीवरून मोहन अर्जुन माळी (शिरपूर), रविंद्र वामन निकुंभ (वडाळी, शहादा) आणि श्रीपाद दुकानाचे मालक (शिरपूर) यांच्या विरोधात भारतीय न्याय संहिता कलम ३१६, ३१८ (४), (५).
रासायनिक खते नियंत्रण आदेश १९८५: कलम ७, १४ व इतर.
अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५: कलम ३, ७, ९, १०.
पर्यावरण संरक्षण कायदा १९८६: कलम ३, ७. २०२३ सह 'अत्यावश्यक वस्तू अधिनियम' आणि 'पर्यावरण संरक्षण कायद्या'च्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या संदर्भात सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस सब इन्स्पेक्टर किरण बाऱ्हे हे तपास करीत आहेत.

### प्रशासनाचा इशारा

अनुदानित युरियाचा औद्योगिक किंवा इतर कामासाठी वापर करणे हा गंभीर गुन्हा आहे. अशा प्रकारे बनावट डी इ एफ तयार करून वाहनधारकांची आणि शासनाची फसवणूक करणाऱ्यांविरुद्ध कडक मोहीम राबवण्यात येईल.

## काँग्रेस पक्षाचा स्थापना दिवस आणि बीड नगरपालिकेच्या सदस्यपदी नवनिर्वाचित नगरसेवक वाजेद कुरेशी यांची निवड झाल्याबद्दल सत्काराचा कार्यक्रम उत्साहात साजरा



दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपालिकेच्या नगरसेवकपदी निवड झालेले कॉंग्रेसचे नवनिर्वाचित सदस्य वाजेद कुरेशी यांचा सत्कार बीड शहर बचाव मंच चे प्राचार्य डी जी तांदळे, नितीन जायभाये, ड नितीन वाघमारे, लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे , यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

आज बीड नगरपालिकेच्या नगरसेवक म्हणून निवडून आलेले कॉंग्रेस पक्षाचे प्रभाग क्रमांक २३ मधून वाजेद भाई कुरेशी यांचा बीड शहर कॉंग्रेस पक्षाच्या कार्यालयात बीड शहर कॉंग्रेसचे अध्यक्ष परवेज भाई कुरेशी यांनी आयोजित केला होता या प्रसंगी प्रदेश कॉंग्रेस कमिटी चे निरीक्षक नवनाथ बापू थोटे यांनी बोलताना कॉंग्रेस हा एकमेव पक्ष आहे जो एका विचारधारेवर कायम आहे आज जाती धर्म पैसा सत्तेचा दुरुपयोग या गोष्टींना कॉंग्रेसची विचारधारा कधीच थारा देत नाही. कॉंग्रेस भविष्यात मोठी मजल गाठू शकेल या देशाला कॉंग्रेस शिवाय प्रयाय नाही असा विश्वास थोटे बापू यांनी व्यक्त केला प्रदेश सचिव गणेश राऊत ,साजिद कुरेशी, मजीद कुरेशी, अमजद कुरेशी, अमन कुरेशी ,उमेर कुरेशी, बीड शहर बचाव मंच चे प्राचार्य डी जी तांदळे, नितीन जायभाये , नितीन वाघमारे, लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे , नितीन गायकवाड इत्यादी उपस्थित होते.

# परळी शहर व तालुका पत्रकार संघाचे दर्पण दिन पुरस्कार जाहीर

## बुरांडे,शेटे,आरबुने,आढाव,प्रा.फुटके यांचा होणार गौरव

दैनिक वादळ वार्ता
**परळी । प्रतिनिधी**



परळी शहर व तालुका पत्रकार संघाच्या वतीने दर्पण दिनानिमित्त दिले जाणारे विविध स्मृती पुरस्कार जाहीर करण्यात आले असून येत्या मंगळवार, ६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता परळी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील विशेष शासकीय विश्रामगृहात भव्य पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष रानबा गायकवाड, तालुका कार्याध्यक्ष नितीन ढाकणे, शहराध्यक्ष शेख मुकरम व सल्लागार भगवान साकसमुद्रे यांनी दिली.दर्पण दिनाच्या निमित्ताने पत्रकारितेतील उल्लेखनीय कार्याची दखल घेत दिवंगत ज्येष्ठ पत्रकारांच्या स्मरणार्थ दिले जाणारे स्मृती पुरस्कार यंदा मान्यवर पत्रकारांना प्रदान करण्यात येणार आहेत.यामध्ये दैनिक दिव्य मराठीचे पत्रकार धनंजय आढाव ,दैनिक परळी समाचारचे संपादक ज्येष्ठ पत्रकार आत्मलिंग शेटे,दैनिक मराठवाडा साथीचे ज्येष्ठ पत्रकार ओमप्रकाश बुरांडे,दैनिक सकाळचे पत्रकार प्रा. प्रवीण फुटके ,दैनिक पुण्यनगरीचे पत्रकार धनंजय आरबुने यांना पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे या गौरव सोहळ्यास त्रिपुरा विद्यापीठाचे माजी कुलगुरू तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वृत्तपत्र विभागाचे माजी विभाग प्रमुख, प्रसिद्ध विचारवंत प्रा. डॉ. वि. ल. धारुरकर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून, त्यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह व सन्मानपत्र प्रदान करून पुरस्कारार्थी पत्रकारांचा यथोचित गौरव करण्यात येणार आहे.

## उत्पादन शुल्क विभागाचा केज तालुक्यात दोन ठिकाणी छापा : देशी दारू दुकानातील बेकायशीर साठा जप्त

दैनिक वादळ वार्ता
**गौतम बचुटे । केज**

उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी केज तालुक्यातील दोन देशी दारू दुकानावर छापा टाकला. या कारवाईत त्यांना बेकायदेशीर अवैध्य दारूचा साठा आढळून आल्याने तो दारूचा माल जप्त केला आहे. या बाबतची माहिती अशी की, दि. २८ डिसेंबर रोजी उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकारी केज आणि साळेगाव येथील सरकारमान्य देशी दुकानावर छापा टाकला. या कारवाईत दोन्ही ठिकाणी त्यांना अवैध्यरित्या वाहतूक परवाना नसलेला बेकायदेशीर दारूचा साठा आढळून आला. सदर बेकायदेशीर साठा करून ठेवलेला दारूचा साठा उत्पादन शुल्क विभागाने ताब्यात घेतला आहे. अद्याप प्रकरणी उत्पादन शुल्क विभागाने कारवाई बाबत सविस्तर माहिती दिलेली नाही. मात्र अशा प्रकारच्या बेकायदेशीर दारू प्राशन केल्याने नागरिकांच्या जीविताला अपाय आणि धोका संभवत असल्याची चर्चा सुरू आहे. तसेच अनेक ठिकाणी सुरू असलेले धाबे आणि हॉटेल्स यावर राजरोसपणे देशी आणि विदेशी बनावट व आरोग्याला अपायकारक मद्यविक्री होत असताना उत्पादन शुल्क विभागाची याकडे डोळेझाक होत असल्याची चर्चा सुरू आहे.

**केज आणि साळेगाव येथील कारवाईत बेकायदेशीररित्या असलेला देशी दारूचा साठा आम्ही ताब्यात घेतला असून गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरू आहे.**

**-विशाल मोहाळे,**
**उत्पादन शुल्क अधिकारी, अंबाजोगाई**

## केज तालुक्यातील तांबवा येथे चौदा वर्षीय मुलीची गळफास घेऊन आत्महत्या

दैनिक वादळ वार्ता
**गौतम बचुटे । केज**

केज तालुक्यातील तांबवा येथे नववीच्या वर्गात शिकत असलेल्या चौदा वर्षाच्या मुलीने सिलिंग फॅनला साडीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. या बाबत माहिती अशी की, तांबवा ता. केज येथील विवेकानंद विद्यालय केज येथे इयत्ता ९ वी च्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या कु. तनुजा गोविंद चाटे वय (१४ वर्ष) हिने दि. २८ डिसेंबर रोजी दुपारी दोन मजली घरच्या पहिल्या मजल्यावर असलेल्या रुमचा दरवाजा आतून बंद करून सीलिंग फॅनला साडीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. दुपारी ४:३० वाजण्याच्या सुमारास पोलिसांना आत्महत्येची माहिती मिळाल्या नंतर पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या आदेशाने सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप मांजरमे, पोलिस निरीक्षक उमेश निकम आणि पोलीस कर्मचारी घटनास्थळी हजर झाले. पोलिसांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी उपजिल्हा रूग्णालय केज येथे आणला आहे. दरम्यान या घटनेमुळे हळहळ व्यक्त होत आहे. मात्र आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

## मशिनरीचे दुकान फोडले एक लाख ६१ हजाराचा माल

दैनिक वादळ वार्ता
**गौतम बचुटे । केज**

केज येथे अज्ञात चोरट्यांनी कृषी मशिनरी दुकानाचा पाठीमागील पत्रा कापून दुकानातील १ लाख ६१ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना शहरात घडली.



केज तालुक्यातील सारणी (आ.) येथील कमलाकर महादेव सोनवणे यांचे शहरातील मंगळवार पेठ कॉर्नरला कृषी सेवा व मशिनरीचे दुकान आहे. २६ डिसेंबर रोजी रात्री ९:०० वाजता त्यांनी दुकान बंद केल्या नंतर रात्री उशीरा अज्ञात चोरट्यांनी दुकानाच्या पाठीमागीचा पत्रा कापून दुकानात प्रवेश केला. दुकानातील ५० हजार रुपयांचे ४ एम.एम. चे ५०० मीटर पट्टी केबल वायर, २६ हजार २५० रुपयांचे २.५ एम.एम. चे ३५० मीटर पट्टी केबल वायर, २७ हजार रुपये किंमतीच्या ३ एच पी च्या दोन मोटार, ४ हजार५०० रुपयांच्या अर्धा व एक एच पी च्या दोन मोटार, १९ हजार ५०० रुपयांचे ३ पेरणी यंत्र, ६ हजाराचे ३ प्लॅन लेटर बंडल, ६ हजार २५० रुपयांचे ५ स्टार्टर, ८ हजार रुपयांचे २० अँटिस्विच, ९ हजार रुपयांचे २ पेटी बायोपोनिक, ४७५० रुपयांचे ५ बायोपावर बकेट असा एकूण १ लाख ६१ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी चोरून नेला. कमलाकर सोनवणे यांच्या फिर्यादी वरून अज्ञात चोरट्यां विरुद्ध गु. र. नं. ७०९/२०२५ भा. न्या. सं. ३३१(४), ३०५(अ) नुसार चोरीचा गुन्हा दाखल झाला आहे.

तपास सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक लक्ष्मण किर्तने हे करीत आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077